THE MET LEAGUE OF COLLEGES
MET Bhujbal Knowledge City
AS SHARP AS YOU CAN GET
Adgaon, Nashik - 422003 | Tel.: (0253) 2303515 | Mob.: +91 9881100099
e-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbkc.edu.in
ISO 9001:2015 CERTIFIED
INSTITUTE OF TECHNOLOGY POLYTECHNIC
DTE CODE 5244

## We are Proud of our Alumni !! आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.







**Mr. Chandrashekar Deshmukh, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2010-11 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** Currently working as a**Reliability Engineer** at **John Crane Singapore PTE LTD** Singapore

प्रणाली अभियांत्रिकीची (System Engineering) उपशाखा असलेल्या Reliability Engineering मध्ये, मुख्यतः उपकरणांच्या व उत्पादनांच्या कार्यक्षमतेवर भर दिला जातो. एखाद्या प्रणाली घटकांची निर्धारित स्थिती व निर्दिष्ट वेळेत कार्य करण्याची क्षमता म्हणजे, विश्वसनीयता (Reliability). सध्याच्या कोविड -१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर व चिनी उत्पादनांच्या गुणवत्ता निकषांवर असलेल्या प्रश्नचिन्हांमुळे, संपूर्ण जगांसह भारतीय उद्योगांनाही जागतिकीकरण व उदारीकरणाच्या सहाय्याने, आंतरराष्ट्रीय मानांकनाप्रमाणे उत्कृष्ट गुणवत्ता व विश्वसनीयता टिकविणे अत्यावश्यक झाले आहे.

बाजारात उपलब्ध असणाऱ्या विविध उत्पादनांची किंवा एखादया ब्रँडची प्रतिष्ठा तयार करणे वा संपविणे, हे पूर्णपणे त्या उत्पादनाच्या वा ब्रॅण्डच्या विश्वसनीयता (Reliability) कामगिरीवर अवलंबून असते. उत्पादनातील चुकांचे व अपयशाचे प्रमाण कमी करणे, दुरुस्ती परिणामकारकता वाढविणे, दुरुस्ती वेळ व खर्च कमी करणे हे, Reliability Engineers चे मुख्य उद्दिष्ट असून, मालमत्ता वा उत्पादनावर प्रतीकुल परिणाम करणाऱ्या घटकांचा, विश्वसनीयतेतील धोका ओळखून, त्यानुसार व्यवस्थापन करणे, हे Reliability Engineers चे मुख्य कार्य असते. थोडक्यात Reliability Engineer हा नुकसान निर्मुलन (Loss Elimination), धोका व्यवस्थापन (Risk Management) व उत्पादन जीवनचक्र व मालमत्ता व्यवस्थापन (Life Cycle Asset Management) ह्या महत्वाच्या भूमिका पार पाडतो . विश्वसनीयता व गुणवत्ता ह्या परस्परपूरक संकल्पना असून, साधरणतः गुणवत्तेमध्ये, उत्पादनाच्या वा प्रणालीच्या दोषांपासून संरक्षण देण्याच्या हमीवर भर दिला जातो. विश्वसनीयतेमध्ये उत्पादनाच्या वा प्रणालीच्या नियमित वापर व जीवन चक्राचा (Product Life Cycle) विचार करत निर्माण होणाऱ्या चुका नियंत्रित करण्याकडे विशेष लक्ष दिले जाते.

**श्री. चंद्रशेखर दिलीपराव देशमुख,** हा मेट पॉलीटेकनिक च्या, यंत्र अभियांत्रिकी विभागातील, शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील उत्तीर्ण विद्यार्थी. सध्या तो सिंगापुर येथील, John Crane Singapore PTE LTD या जगातील तंत्रज्ञान क्षेत्रांतील आघाडीच्या कंपनीत, Reliability Engineer म्हणून कार्यरत आहे. उत्तम श्रोता, सातत्याने नवीन शिकत स्वतःला अद्ययावत ठेवण्याची तयारी व चिकाटी अंगी असणाऱ्या चंद्रशेखरने, त्याच्या डिप्लोमाच्या तीन वर्षांच्या शैक्षणिक कालावधीत मेहनतीने, अभ्यास करत, विभागाच्या व संस्थेच्या विविध उपक्रमात सहभाग नोंदवत, मेट पॉलीटेकनिक मधून, मेकॅनिकल शाखेतून पदविका अभ्यासक्रम, विशेष प्राविण्यासह पूर्ण

केला. त्यानंतर त्याने, पुणे विद्यापीठातून यंत्र अभियांत्रिकीमधून पदवी व सिम्बॉयसिस या संस्थेतून Sales & Marketing मधून Post

Graduate Diploma in Business Administration (PGDBA) हा अभ्यासक्रम पूर्ण केला. पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, त्याने काही काळ पुण्यातील KSB Pumps व Forbes Marshal ह्या नामांकित उद्योगसमूहात अनुक्रमे, Service Engineer व Trainee Engineer in Project Management ह्या पदांवर काम केले.

सध्या तो कार्यरत असलेल्या, John Crane ह्या क्रेन पॅकिंग निर्मिती पासून सुरु झालेल्या उद्योगाला, मोठा औद्योगिक वारसा लाभला असून, दुसऱ्या महायुद्धापूर्वी कंपनीचे इंग्लंड स्थित कामकाज Tube Investment (TI) ह्या कंपनीकडे सुपूर्त करण्यात आले. पुढे १९८७ मध्ये,TI ग्रुपने कंपनीच्या जगातील इतर विभागांचा ताबा घेत John Crane या नावानं कंपनीची पुनर्बांधणी केली. २००० मध्ये, TI ग्रुपचं पुनःश्च लंडन स्थित तंत्रज्ञान क्षेत्रांतील आघाडीच्या Smith Industries मध्ये विलीनीकरण करण्यात आले. आजमितीला John Crane ही, Smiths Group मधील सर्वात मोठी सहाय्यक कंपनी असून, त्यात जगभरातून ५८०० कर्मचारी कार्यरत आहेत.

John Crane मध्ये, चंद्रशेखर हा ग्राहक समर्थन (Customer Support), आंतरराष्ट्रीय विक्री (International Sales), व विश्वसनीयता व्यवस्थापन (Reliability Management) ह्या कुठल्याही उद्योगांसाठी अत्यावश्यक व प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या घटकांवर काम पाहतो. ग्राहकांच्या सर्व प्रकारच्या तक्रारी व सूचनांचे परिपूर्ण समाधान व उपाय शोधत, अनपेक्षीतपणे उद्भवलेल्या विशिष्ट समस्या, कौशल्याने सोडवत, उत्पादनाचे मूल्यमापन करणे हा त्याच्या तेथील कामाचा महत्वाचा भाग आहे. त्यासाठी त्याला, कंपनीच्या तळापासून शीर्षस्थ स्तरावरील विभागप्रमुख तसेच व्यवस्थापकांपर्यंत सवांद साधणे आवश्यक असते. त्यामुळेच उत्तम Reliability Engineer बनण्यासाठी प्रभावी सवांद कौशल्य (Effective Communication Skills), संघव्यवस्थापन (Team Management), वाटाघाटी व योजना कौशल्य (Negotiation & Planning), निर्णय क्षमता (Decision Making) हे गुण अत्यावश्यक आहेत , असे तो स्वानुभवातून नमूद करतो.

प्रख्यात गुणवत्ता गुरु एडवर्ड डेमिंग, विश्वसनीयता अर्थात Reliability चे महत्व अधोरेखित करताना म्हणाले होते, "We have learned to live in a world of mistakes and defective products as if they were necessary to life". जगातील कुठलाच उद्योग-व्यवसाय हा Reliability Engineering च्या उत्तम ज्ञान व यशस्वी अमंलबजावणी शिवाय परिणामकारक प्रगती साधू शकत नाही. सध्याच्या अवकाश युगात, वर्तमान व भविष्यातील विविध अवघड अशा मानवविरहित आणि मानवी अवकाश प्रकल्पांच्या यशस्वीतेसाठी (यांत अपोलो-मानवी चांद्रमोहीम , दळणवळण उपग्रह , स्पेस शटल्स तसेच मानव रहित ऑरबिटल्स लॅब्स इ. सारख्या प्रकल्पांचा समावेश ) प्रचंड विश्वासाहर्ततेची व त्यामुळे त्यातील तज्ज्ञ अभियंत्यांची आवश्यकता भासत आहे.

दुसरीकडे भांडवली व ग्राहकोपयोगी उत्पादन उद्योजक, आपल्या उत्पादनांच्या विश्वासाहर्तता (Reliability), सुरक्षा (Safety), आणि गुणवत्ते (Quality) बद्दल अधिक जागरूक झाले असून, Reliability Engineering चा वापर उत्पादन व गुणवत्ता वाढीसाठी करत आहे. त्यामुळे मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थांना या क्षेत्रांत उत्तम संधी असून, त्यांनी सातत्याने त्या दिशेने आपल्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल करून मार्गक्रमण करणे आवश्यक असल्याचे चंद्रशेखर म्हणतो.

थोडक्यात PRIDE म्हणजे “Put Reliability in Daily Efforts” या Relaibility मधील तत्वाचा प्रभावी वापर करत चंद्रशेखरही, आपल्या विश्वासाहर्ततेने आपली व काम करत असलेल्या उद्योगाची प्रगती साधेल याची खात्री आहे. चंद्रशेखरला त्याचा भावी यशस्वी कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !!!

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे,**
विभागप्रमुख - यंत्र अभियांत्रिकी विभाग,
मेट पॉलीटेकनिक-भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक.